SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६००४ महाराष्ट्र
वेबसाईट : www.unishivaji.ac.in
E-mail : appointment.a@unishivaji.ac.in & appointment.b@unishivaji.ac.in
दूरध्वनी :– 2609102, 2609103
Estd.1962
NAAC 'A' Grade

संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/ 404 दि. 9 DEC 2020

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/अधिविभागप्रमुख,
सर्व सलंग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त शिक्षणसंस्था/विद्यापीठ अधिविभाग

**विषयः उन्हाळी 2020 मधील पदव्युत्तर अभ्यासकमाच्या विषम सत्राच्या परीक्षेच्या नियोजनाबाबत.**
**(अंतिम वर्ष/अंतिम सत्र वगळून)**
**संदर्भ : संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/403, दि. 07.12.2020**

**महोदय/महोदया,**

विद्यापीठ अधिकार मंडळाच्या ठरावानुसार उन्हाळी 2020 मधील सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी विहित प्रकियेद्वारे परीक्षा शुल्क भरलेल्या **(अंतिम सत्र/अंतिम वर्ष परीक्षा वगळून)** पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या (Repeater Students) **विषम सत्राच्या** परीक्षा संबंधीत अधिविभाग स्तरावर/मार्फत परीक्षेच्या आयोजनाबाबत उपरोक्त संदर्भीय पत्राने सर्व विद्यापीठ अधिविभाग/सर्व संलग्नीत महाविद्यालये यांना कळविण्यात आलेले आहे.

पदव्युत्तर अभ्यासकमाच्या संबंधीत विषयाच्या विद्यापीठ अधिविभागामार्फत वेळापत्रक तयार करणे, वेळापत्रक प्रसिध्द करणे, प्रश्नपत्रिका तयार करणे व संपूर्ण परीक्षेचे नियोजन करण्यात येत आहे. त्याकरीता सर्व संबंधीत महाविद्यालयांनी खालीलप्रमाणे तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

1. **ज्या संलग्नीत महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर अभ्यासकमाच्या ज्या विषयास विद्यार्थी परीक्षेस बसणार आहेत त्या महाविद्यालयांनी ज्या त्या विषयाच्या विद्यापीठ अधिविभागांना आपल्या महाविद्यालयातील परीक्षेचे कामकाज पाहणारे समन्वयक यांचे नांव, मोबाईल नंबर व अधिकृत ईमेल आयडी इत्यादी माहिती तात्काळ पाठविण्यात यावी. (सदर ईमेल द्वारे संबंधीत विषयाच्या अधिविभागाकडून प्रश्नपत्रिका पाठविण्यात येईल)**
2. सर्व महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी (दूरशिक्षण केंद्राकडे प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यासहीत) कोणकोणत्या विषयास परीक्षेस बसणार आहेत याची माहिती ज्या त्या विषयाच्या विद्यापीठ अधिविभागास पाठविण्यात यावी. जेणेकरून विद्यापीठ अधिविभागांना प्रश्नपत्रिकेचे नियोजन करणे सोईचे होईल.
3. सर्व संलग्नित महाविद्यालयांनी संबंधीत विद्यापीठ अधिविभागांना आवश्यक माहिती पाठवून वेळापत्रक, प्रश्नपत्रिका इत्यादी उपलब्ध करून घेणे आवश्यक आहे. ऐनपरीक्षेवेळी कोणतीही अडचण उदभवणार नाही याची दक्षता घेणेत यावी
4. कोव्हीड–19 बाबत प्रोटोकॉल बाबत योग्य ती सर्व कार्यवाही करण्यात यावी.

(श्री. ग. र. पळसे)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रतः
1. मा. प्राचार्य, संचालक, अधिविभागप्रमुख यांना माहितीसाठी/योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी
2. मा. संचालक, दूरशिक्षण विभाग
3. सर्व उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक– परीक्षा विभाग
4. आयटी कक्ष – संबंधीत अभ्यासकमाच्या परीक्षेकरीता संगणक प्रणालीतून योग्य ती सुविधा उपलब्ध करून दयावी.